# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 04/2024 दिनांक : 02.01.2024**

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**माहूर :–** दिनांक 31.12.2023 रोजी 02.00 वा. चे सुमारास, **मौजे. ईवळेश्वर शेत शिवारात ता. माहूर जि. नांदेड येथे**, यातील नमुद चार आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी व त्यांचे पत्नीस काही कारण नसताना लोखंडी रॉड, काठीने व चाकुने डोक्याला, छातीला व पायाला गंभीर दुखापत करून खुन करण्याचा प्रयत्न केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी अनिता हरीओम जाधव, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. ईवळेश्वर ता. माहूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे माहूर** गुरनं 01/2024 कलम 307,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री पवार, मो.क्रं. 9823294566** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 31.12.2023 रोजी 21.00 वा. चे सुमारास, **स्वामी विवेकानंद शाळेजवळ दिक्षानगर, नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा कामाचे पैसे घेवून घराकडे जात असताना यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून दारू पिण्यासाठी पैसे दे म्हणुन फिर्यादीस थापड बुक्यांनी मारहाण करून चाकुचा धाक दाखवुन खिशातील नगदी 1500/–रूपये काढून ढकलुन दिल्याने फिर्यादी खाली पडून उजव्या डोळयास खरचटले त्यावेळी फिर्यादीचा मित्र भांडण सोडवण्यासाठी आला असता आरोपीतांनी त्यास पण थापड बुक्यानी व दगडाने मारहाण करून खिशातील विवो कंपनीचा मोबाईल किंमती 1200/– रूपयेचा जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी दत्ता पिराजी गायकवाड, वय 24 वर्षे, व्यवसाय मिस्त्री रा. बळीरामपूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 02/2024 कलम 394, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/486 तेलंग** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**1)लोहा :–** दिनांक 31.12.2023 रोजी 20.00 वा. चे सुमारास, **मौजे. पोलीसवाडी ता. लोहा जि.नांदेड येथे**, यातील फिर्यादी हे त्याच्या घरासमोर ॲपे ॲटो क्रमांक एम.एच.–26/बिडी–0453 किंमती 2,00,000/–रूपयाचा नमुद ठिकाणावरून यातील नमुद आरोपीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी माधव संग्राम हुगे, वय 35 वर्षे, व्यवसाय ॲटो चालक रा. पोलीसवाडी ता.लोहा जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 01/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2318 चोपवाड, मो.क्रं.9823324584** हे करीत आहेत.

**2)मुखेड :–** दिनांक 31.12.2023 रोजी 12.00 वा. ते दिनांक 01.01.2024 रोजी 07.00 वा.दरम्याण, **मौजे. होकरणा ता. मुखेड जि.नांदेड येथे**, यातील फिर्यादी चे शेत मालक यांचे शेतातील पाण्याचे बांधावर बसविलेली पाण्याची मोटार पाच एच.पी. किंमती 21,700/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी रमेश जळबा फिंगरवाड, वय 25 वर्षे, व्यवसाय शेती रा. मेथी ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 01/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउनि/वाघमारे, मो.क्रं.9923481762** हे करीत आहेत.

## 4)प्राण्यांना क्रुरतेने वागणुक :–

**कुंडलवाडी :–** दिनांक 01.01.2024 रोजी 17.00 वा. चे सुमारास, **जोड मारूती मंदिर रोडवर, कुंडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने त्याचे ताब्यातील तीन बैल गोवंश जनावरे एकुण किंमती 60,000/–रूपयाचे त्यांची कोणत्याही प्रकारची काळजी न घेता त्यांना काठीने मारहाण करत जनावरे कतली साठी घेवून जात असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1876 श्री रघुवीरसिंह विठ्ठलसिंह चौहान, ने. पोस्टे कुंडलवाडी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंडलवाडी** गुरन 02/2024 कलम 5(अ),5(ब),9,9(ब), सह कलम 11 महाराष्ट्र प्राणीसंरक्षण व प्राण्यांना क्रुरतेने वागणुक अधिनियम 1995 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2821 चव्हाण, मो.क्रं. 9823017330** हे करीत आहेत.

## 5)प्रोव्हिबीशन :–

**अर्धापूर :–** दिनांक 31.12.2023 रोजी 21.10 वा. चे सुमारास, **अमोल फॅमिली हॉटेलमध्ये भोकर फाटा चौकात ता. अर्धापूर जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा व विदेशी दारू असा एकुण किंमती 2710/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2343 गंगाधर विठ्ठल कदम, ने. स्थागुशा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 01/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2215 पाटील, मो. नं. 9923670999** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 05 / 2024 दिनांक : 02.01.2024**

पोलीस स्थापना दिवस (**Raising Day**) निमित्त दौडचे आयोजन....

नांदेड पोलीस दलातर्फे दरवर्षा प्रमाणे या ही वर्षी **"रेजिंग डे"** दिनांक 02 ते 08 जानेवारी दरम्यान वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. त्या अनुषंगाने आज दिनांक 02 जानेवारी, 2023 रोजी सकाळी 07.00 ते 08.00 वा. च्या दरम्यान **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली दौडचे आयोजन करण्यात आले.

**मा. जगदीश भंडरवार,** पोलीस निरीक्षक, आर्थीक गुन्हे शाखा, नांदेड यांनी हिरवी झेंडी दाखवुन दौडला सुरूवात करण्यात आली. दौड करीता नांदेड शहरातील सर्व पोस्टेचे पोलीस स्टेशन प्रभारी व शाखा प्रभारी तसेच क्युआरटी, आरसीपी, स्थागुशा, पोलीस मुख्यालय येथील अंमलदार, तसेच इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी भाग घेतला होता. सदरची दौड ही पोलीस अधिक्षक कार्यालय येथुन सुरू होवुन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, महात्मा गांधी पुतळा, गुरूव्दारा चौरस्ता, देना बॅक, महावीर चौक, मल्टी पर्पच हायस्कुल समोरून तरोडेकर मार्केट, वजिराबाद चौक, पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड अशा प्रकारे दौड संपन्न झाली.

या प्रसंगी **मा. जगदीश भंडरवार,** पोलीस निरीक्षक, आर्थीक गुन्हे शाखा, नांदेड, **मा. उदय खंडेराय**, पोलीस निरीक्षक, स्थागुशा, नांदेड, **मा. संतोष तांबे**, पोनि इतवारा, **मा. श्री विजय धोंडगे**, रापोनि पोलीस मुख्यालय नांदेड, **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी नांदेड, शहरातील विविध पोलीस स्टेशन, शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी मोठया प्रमाणात सहभाग नोंदवला.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड



पोलीस दल स्थापना दिवस
(Raising Day)
दिनांक : ०२ जानेवारी २०२४ ते ०८ जानेवारी २०२४
नांदेड जिल्हा पोलीस दल
OPPO Reno5 Pro 5G